दिनांक १४ नोव्हेंबर २०१६ रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाने ९७ व्या "नाट्यसम्मेलनाध्यक्षपदी" माझी बिनविरोध निवड केली, त्याबद्दल मी नियामक मंडळाचा आभारी आहे. या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर मी विराजमान व्हावें म्हणून ज्या सभासदांनी प्रयत्न केले, मला सहाय्य केलें त्या सर्वांचा मी ऋणी आहे. माझी निवड जाहिर झाल्यानंतर जगभरातून व संपूर्ण भारतातून भरभरून आलेल्या प्रतिक्रियांमुळे मी आधी आश्चर्यचकीत झालो व भारावूनही गेलो. अनेकांनी अनेक अपेक्षा माझ्याकडून बाळगल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देऊन रसिकांच्या, कलाकार बांधवांच्या कसोटीस पूर्णपणे उतरण्याच्या निश्चयानें मी या संमेलनाध्यपदाच्या खुर्चीचा स्वीकार करीत आहे.

मी अद्यापही रंगमंचावर काम करत असल्यामुळें, अन्य गोष्टींकडे न वळता, व्यवसायातील अडचणी व मला सुचलेले उपाय आपल्यासमोर मांडू इच्छितों.

१) रंगमंच कामगारांना घरें द्यावीत अशी मागणी आजवर अनेक वेळां करण्यात आली आहे. परंतु घर मिळाल्यावर सुरुवातीला भरावे लागणारे पैसे व नंतरचे मासिक हप्ते कसे द्यावेत, यावर मार्गदर्शन झालेले नाहीं. त्याबाबत संबंधित मंत्रीमहोदयांकडे विचारणा केली असतां, बँकांमार्फत पैसे भरण्याची व्यवस्था करण्याची खटपट चालू आहे व त्याचा अनुकूल निर्णय लवकरच लागेल असे कळलें.

२) विमा योजनेनुसार, आजारपण व उतारवयात मिळणारी रक्कम याचा विचार होऊन, त्याचा कामगारांना फायदा मिळवण्यासाठीं त्वरित हालचाल होणे आवश्यक आहे. याबाबत संबंधित संघाचे प्रतिनिधी आणि अर्थकारण तज्ञ यानी जाणीवपूर्वक एकत्र येऊन योजना तयार करायला हवी.

३) एकेकाळीं अस्तित्वात असलेली ठेकेदार पद्धत ही जमात पूर्णपणे संपुष्टात आली असून, बाहेरगावी-शहरे सोडून अन्यत्र प्रयोग होणे कठीण झालें आहे. यासाठीं कराराने प्रयोग घेऊन जवळपासच्या गावागावातून